# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर-४१६००४

परिपत्रक क्र.कोविमं/ए-२/उ.मा./फेब्रु-मार्च २०२३/दिनांक ०९/०१/२०२३
१३ जा.क्र - २८६०.

## उच्च माध्यमिक प्रात्यक्षिक /तोंडी/ प्रकल्प/ अंतर्गत परीक्षा आयोजित करणे, गुणतक्ते भरणे व साहित्य जमा करण्याबाबतच्या सूचना

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **फेब्रु/मार्च २०२३** परीक्षेच्या शास्त्र,तंत्र,व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा **तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा दिनांक ०१/०२/२०२३ ते दिनांक २०/०२/२०२३** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांचे गट(बॅचेस) पाडून प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे तयार केलेल्या विषयनिहाय वेळापत्रकाची एक प्रत या कार्यालयाकडे पाठवून दयावी. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा नव्याने देणेची आहे. तसेच उपरोक्त नियमित कालावधीमध्ये ज्या विद्यार्थ्यांची शास्त्र, तंत्र, व्यावसायिक तसेच किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा होवू शकली नाही, अशा विद्यार्थ्यांची आउट ऑफ टर्न ने **शास्त्र,भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २३/०३/२०२३ ते दिनांक २५/०३/२०२३** या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कॉलेजच्या अनुपस्थितीत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रात्य./तोंडी परीक्षा या निर्धारीत कालावधीतच घेण्यात यावी.

१) **उत्तरपत्रिका**-प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका विषयनिहाय,एका दिवसाच्या एका विषयाच्या सर्व बॅचच्या उत्तरपत्रिका एका पाकिटात घालून विषयनिहाय पाकिटे सिलबंद करावीत, पाकिटांवर लिहिलेल्या बैठक क्रमांकांच्याच उत्तरपत्रिका त्याच पाकिटात राहतील याची दक्षता घ्यावी पाकीटावर बैठक क्रमांक, विषय क्रमांक, विषय, गैरहजर विद्यार्थी बैठक क्रमांक कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक इ.स्पष्ट ठळक अक्षरांनी स्केचपेनने लिहावेत.

**तसेच भाषा विषयांच्या तोंडी परीक्षेच्या उत्तरपत्रिका,अंतर्गत मुल्यमापन विषयाचे प्रकल्प/ सेमिनार/जर्नल कार्य इ. परीक्षेच्या उत्तरपत्रिका या कार्यालयाकडे पाठविण्यात येवू नयेत. पर्यावरणाच्या फक्त गुणपत्रिका जमा करणेच्या आहेत प्रकल्प /सेमिनार /जर्नल कार्य इत्यादी साहित्य निकाल लागल्यापासून सहा महिन्यापर्यंत आपल्याकडेच जतन करुन ठेवावेत.**

**ज्या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका नाहीत अशा विषयांचे प्रात्यक्षिक परीक्षेचे सर्व रेकॉर्ड कनिष्ठ महाविद्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.**

२) **गुणपत्रिका- तोंडी/प्रकल्प/अंतर्गत परीक्षा/प्रात्यक्षिक परीक्षा**

**अ) सर्वसाधारण विषय असलेले महाविद्यालय:**

कनिष्ठ महाविद्यालयाने घेतलेल्या १) तोंडी/प्रकल्प/अंतर्गत परीक्षा २) प्रात्यक्षिक परीक्षा ३) BiFocal विषयांसाठी III प्रात्यक्षिक व IV प्रात्यक्षिक परीक्षा याप्रमाणे गुणपत्रिकांचे अनुक्रमांकानुसार क्रमवार विषयनिहाय लावून सदरहू गुणपत्रिका मंडळाने पुरविलेल्या तोंडी, प्रकल्प, अंतर्गत परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षेची गुणतक्ते मोठया एकाच पाकिटामध्ये सर्व एकत्रित भराव्यात व पाकिटावर सदर पाकिटामध्ये भरलेल्या विषयांची, विषय व गुणपत्रक पृष्ठ क्रमांक पासून-पर्यंत अशी नोंद करावी.

**ब) MCVC विषय असलेले महाविद्यालय:**

**MCVC** विषय शिकविणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयासाठी तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेची स्वतंत्र गुणतक्ते असून तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा झाल्यानंतर तोंडी परीक्षेचे विषय तसेच MCVC विषयांसाठी III प्रात्यक्षिक व IV प्रात्यक्षिक याप्रमाणे गुणपत्रिका अनुक्रमांकानुसार **मंडळाने पुरविलेल्या** एकाच पाकिटामध्ये सर्व एकत्रित भराव्यात. पाकिटावर गुणपत्रिकांचे विषय व गुणपत्रक पृष्ठ क्रमांक पासून-पर्यंत अशी नोंद करावी. BiFocal व MCVC च्या ज्या विषयासाठी III प्रात्यक्षिक व IV प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जातात अशा विषयाचे गुण नोंदविताना ज्या-त्या गुणपत्रिकेतच नोंदवित असल्याची खात्री करुनच नोंद करावी. तसेच या पाकिटामध्ये प्रात्यक्षिक परीक्षेस अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे विषयवार बैठक क्रमांक निहाय अहवाल पूर्वी प्रमाणे Absentee Report च्या पाकिटामध्ये घालून ते छोटे पाकिट मुखपृष्ठावरील सर्व नोंदी करुन गुणपत्रिकांच्या मोठया पाकिटामध्ये घालून सिल करावे. गुणपत्रिकाची दुमड किंवा घडी करु नये.

प्रात्यक्षिक, तोंडी व पर्यावरण परीक्षेचे गुणतक्ते भरत असताना काही विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांका समोर गुण लिहिले जात नाहीत. गुणाचा रकाना रिकामा सोडला जातो अथवा **MM** लिहिले जाते याबाबत सूचित करण्यात येते की, विद्यार्थी नो कॅन्डेट असल्यास **NC (No Candidate)** लिहावे.गैरहजर असल्यास त्याची पडताळणी व खात्री करुन **AA** लाल शाईने लिहावे. गुणपत्रिकेत कोणताही रकाना रिकामा **(Blank)** रहाणार नाही, ओव्हर राईटींग **(Over Writing)** होणार नाही, खाडाखोड होणार नाही याची दक्षता घ्यावी. काही शिक्षक पान निहाय गुणांची बेरीज करीत नाहीत ती अचूकतेने करावी याची नोंद घ्यावी व प्रत्येक पानावर संबंधित शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

**जर एखाद्या विद्यार्थ्याच्या विषयाचे माध्यम चुकीचे नोंदविण्यात आले असल्यास त्याचे गुण मूळ गुणपत्रिकेवरील प्रिंटेड बैठक क्रमांकासमोरच नोंदवावेत (जरी माध्यम चुकीचे असले तरी) इतरत्र बैठक क्रमांक नमूद करुन गुण नोंदवू नयेत. तथापि अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषयास सूट ऐवजी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण बैठक क्रमांक निहाय व विषय निहाय लेटर हेड वरती नोंद करुन या नोंदीचे पान गुणपत्रिकेच्या पाकीटामध्ये देण्यात यावे.**

३)**गैरहजेरी अहवाल:-** कनिष्ठ महाविद्यालयातील झालेल्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या विषयांचे गैरहजेरी अहवाल पूर्वीप्रमाणे भरुन उपरोक्त गुणतक्त्याच्या वर्गीकरणानुसार तसेच (विषयाच्या सांकेतिक क्रमांकाच्या चढत्या क्रमाने करावे.)विषयनिहाय अहवाल वर्गीकरण करुन गैरहजेरी अहवालाच्या छोटया पाकिटामध्ये अहवाल भरुन ते पाकिट सिलबंद करुन गुणतक्त्याच्या पाकिटामध्ये भरावे. तसेच पाकीटावर ठळक अक्षरात समाविष्ट केलेले विषय व विषयाचा क्रमांक, कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक इ. तपशिल लिहावा. गैरहजेरी अहवालात इतर कोणतेही कागदपत्रे जोडू नयेत.

प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका, गुणपत्रिका, गैरहजेरी अहवाल, देयके, गोपनीय अहवाल इ.सर्व कागदपत्रे विषयनिहाय सुचना दिल्याप्रमाणे मंडळाने पुरविलेल्या स्वतंत्र पाकिटांमध्ये सिलबंद करुन संबंधित जिल्हा स्वीकृती केंद्रावर **बुधवार दिनांक २२/०२/२०२३** रोजी देण्यात यावे. भाषा व इतर विषयांच्या गुणपत्रिका तसेच ग्रेडलिस्ट स्वतंत्र पाकिटामध्ये सिलबंद करुन पाकिटावर विषयाचा व कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांकाचा स्पष्ट उल्लेख करून जिल्हा स्विकृती केंद्रावर प्रात्यक्षिक साहित्यासोबत देण्यात यावे.

फेब्रु/मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक व भाषा व इतर विषय तोंडी परीक्षेच्या कार्यक्रमाची नोंद प्राचार्यांनी घ्यावी व वितरण केंद्रावर साहित्य जमा करणेसाठी आपल्या प्रतिनिधींना पाठविण्याची व्यवस्था करावी.

परीक्षा संपल्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य खाली दर्शविल्याप्रमाणे पाकिटामध्ये सीलबंद करुन वितरण केंद्रावर जमा करावीत.

१)प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकेचे पाकिटे २)सर्व विषयाचे गुणपत्रिका पाकिटे ३)देयकांचे पाकिट ४)ग्रेडलिस्ट पाकिट

वरीलप्रमाणे सर्व कनिष्ठ महाविद्यालयानी प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य मंडळाने कळविलेल्या तारखांना जिल्हा वितरण केंद्राकडे जमा करावयाचे आहे.

- **महत्वाचे:-**

**१) फेब्रु / मार्च २०२३ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस जे पुनर्परीक्षार्थी प्रविष्ठ होणार आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांना ते प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विषयांची प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षा पुन:श्च देणे अनिवार्य राहील.**

**२) तोंडी / प्रात्यक्षिक/पर्यावरण परीक्षेस विद्यार्थी हजर असतानाही गैरहजर दर्शविल्याचे व निकालानंतर हजर असल्याबाबत कळविण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या निकालात बदल झाल्याचे यापूर्वी अनेकवेळा निदर्शनास आले आहे. त्यामुळे विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री केल्याशिवाय त्याच्या बैठक क्रमांकासमोर गैरहजर शेरा नोंदवू नये तसे झाल्यास निकालानंतर विद्यार्थ्यांचा निकाल बदलून दिला जाणार नाही व संबंधित प्राचार्य आणि विषय शिक्षक यांनाच जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.**

**३) वितरण केंद्रप्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रात्यक्षिक परीक्षोत्तर साहित्य दि.२२/०२/२०२३ रोजी स्विकारुन सदरचे साहित्य (उत्तरपत्रिका पाकीटे, देयक, गुणतक्ते पाकीटे इ. याप्रमाणे क.महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय) वर्गीकरण करुन तशा याद्या दिनांक २३/०२/२०२३ पर्यंत तयार करून ठेवाव्यात व हे साहित्य आणणेसाठी मंडळाचे प्रतिनिधी आपणाकडे दिनांक २४/०२/२०२३ रोजी टेम्पो घेऊन येतील तेव्हा टेम्पोमध्ये भरण्याची व्यवस्था करावी. आपले साहित्य ओळखता यावे यासाठी लेबल तयार करुन चिटकवावेत व हे स्विकारलेले साहित्य ताब्यात देणेसाठी सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यातील वितरण केंद्र प्रतिनिधी यांनी अनुक्रमे खालीलप्रमाणे मंडळ कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.**

**१. कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा, कागल, करवीर, कोल्हापूर शहर, पन्हाळा, शाहूवाडी या तालुक्यांतील कनिष्ठ महाविद्यालयांनी दिनांक २२/०२/२०२३ रोजी मंडळ कार्यालयात सकाळी १०.०० ते ०४.०० या वेळेत प्रात्यक्षिक साहित्य जमा करावे.**

**२. गडहिंग्लज, आळते, कासारवाडा या वितरण केंद्र प्रतिनिधींनी दिनांक २५/०२/२०२३**

**३. सातारा सर्व वितरण केंद्र प्रतिनिधींनी २७/०२/२०२३**

**४.सांगली जिल्हयातील सर्व वितरण केंद्र प्रतिनिधींनी दिनांक २८/०२/२०२३**

**सर्व वितरण केंद्र प्रतिनिधी यांनी दिलेल्या तारखेस सकाळी १०.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत प्रात्यक्षिक साहित्य जमा करणेसाठी उपस्थित रहावे. कोणत्याही परिस्थितीत सवलत मिळणार नाही.**

(पोवार डी.एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर